निवडणूक तात्काळ

माहे एप्रिल-२०१५ मध्ये संपन्न होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी अधिकार प्रदान करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.५/का.८,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३०/०३/२०१५.

वाचा :- १) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा खंड ३).
२) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९.
३) आयोगाचे दिनांक २७/०१/१९९५ ग्रामपंचायत निवडणुकीबाबतचे अधिकार प्रदानाचे आदेश.
४) आयोगाचे क्रमांक-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दिनांक ०२/०८/२००६ चे परिपत्रक.

## आदेश

भारतीय संविधानाच्या कलम २४३-के अनुसार आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून माहे एप्रिल-२०१५ मध्ये संपन्न होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीच्या विविध टप्प्यांसाठी आयोगाच्या दिनांक २७/०१/१९९५ च्या आदेशात अंशत: बदल करून या आदेशाद्वारे तहसिलदार यांना प्रदानित करण्यात आलेले अधिकारानुसार तहसिलदार निवडणूक कर्तव्य पार पाडीत नसल्यास त्यांच्यावर आयोगाच्या उक्त संदर्भाकीत **दिनांक ०२/०८/२००६ च्या परिपत्रकानुसार निलंबनाची कार्यवाही तात्काळ करावी** व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा. तसेच अशा तहसिलदारांच्या ऐवजी तहसिलदार यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या गटविकास अधिकारी तसेच इतर तत्सम अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसंदर्भातील दिनांक २७/०१/१९९५ च्या आयोगाच्या आदेशानुसार तहसिलदारांकडे सोपविलेले अधिकार तात्काळ प्रदानित करण्यात येत आहेत. कुठल्याही परिस्थितीत ग्रामपंचायतीची निवडणूक

प्रक्रिया बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी आयोगाच्या मूळ निवडणूक कार्यक्रमातील परिच्छेद ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित विभागीय आयुक्त यांची राहिल.

सदरची सुधारणा हि फक्त वर नमूद केल्याप्रमाणे माहे एप्रिल-२०१५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी लागू असणार आहे.

सदरचे आदेश आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले आहेत.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

30-3-2015
(डॉ. प्रदीप व्यास)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

१) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)